ब

FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ना-म-धि., पहिली खबर क्र. २६ वर्ष २०१८ दिनांक २१/७/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act अत्याचार प्रतिबंधक अधि-१९८९, कलमे Sections ७,१२.
(ii) अधिनियम Act (सुधारणा - २०१५), कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून ३१/७/१८, वेळ ०८:३०, तारीख पर्यंत २१/७/१८, वेळ २३:००
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ३१/६/२०१८, वेळ ०८:३०
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ........, वेळ ........
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पूर्वेस ६ कि.मी., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव इराणी मंजिल बिल्डींगचे गेट जवळ, सेनापती बापट मार्ग, दादर रेल्वे स्टेशन जवळ, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण दादर (प), गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name रामआशिष प्रजापती (b) वडीलाचे / पतीचे नाव रामअचल प्रजापती
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ६३९०८२३८३६
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय रस्त्यावर भाजी विक्री करणे.
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता : रूम नं. खान चाळ मार्ग, गुलाम मोहम्मद ग्रेड्स कॉफर्ड मार्केट, मुंबई - ४००००३. गल्ली / सेवे नं. ........ घर / नावे नंबर ........ फोन / मो. नंबर ........ पॅन नं ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव मु. चिरोंगा पोस्ट पिपरा पो. स्टे. सोनहा
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका भानपुर जिल्हा बस्ती राज्य उत्तर प्रदेश सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) अनिल शंकर म्हस्के वय ५४ वर्षे ② महादेव आप्पा शिंदे वय ४० वर्षे.
पाहिजे आरोपी - किरण कोंढे (सर्व नेमणूक - जी/नॉर्थ, म.न.पा. कार्यालय दादर (प), मुंबई.)

दि. २१/७/१८

यातील फिर्यादी यांचा स्वतंत्र जबाब नोंद करण्यात आला असून तोच प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष,

(गणेश कणडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

सत्य जेरॉक्स प्रजापति

फिर्यादी                                                    दिनांक – ०२/०८/२०१९

श्री रामआशीष रामआचल प्रजापती, वय ३८ वर्षे, धंदा– भाजी विक्री रा.ठि. एन खान सारंग मार्ग, गुलाम मोहमद ब्रेडशॉप क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ०३.

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासमवेत रहावयास आहे. मी दादर रेल्वे स्टेशन पश्चिम या ठिकाणी फुटपाथवर भाजीपाला विक्री करुन मिळणाऱ्या पैशावर माझे व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी सकाळी ०६:०० ते ०९:०० वा. पर्यंत रानडे रोडवरील सुविधा दुकानासमोरील फर्स्ट क्लास दुकानाचे लगत फुटपाथवर भाजी विक्रीचा व्यवसाय करीत करतो. दिनांक २९/०७/२०१९ रोजी मी नेहमी प्रमाणे नमूद ठिकाणी भाजी विक्रीचा धंदा करीत असताना, बृहन्मुंबई महानगर पालीका 'जी/नॉर्थ दादर वॉर्डची फेरीवाल्यांवर कारवाई करणारी गाडी सदर ठिकाणी आली व मी विकत असलेल्या भाजीपाल्याची टोपली उचलुन गाडीत टाकुन घेवून गेले. त्यावेळी मनपा कर्मचारी म्हस्के याने मला सांगितले की, रस्तेपे धंदा करणा है तो महिनेका चार हजार रूपया देणा पडेगा उसके लिये लोंढे साहबसे बात करो.

त्यानंतर दिनांक ३१/०७/२०१९ रोजी मी धंदा बंद करून बसलो होतो. त्या वेळी सदर ठिकाणी महानगरपालीका जी/नॉर्थ, दादर वॉर्डचे कर्मचारी श्री. म्हस्के मला येवून भेटले व रस्त्यावर भाजी विक्रीचा धंदा करायचा असेल तर महिन्याला ४०००/– रू. लाचेचा हप्ता दयावा लागेल अन्यथा कारवाई करेल असे सांगुन किरण लोंढे साहेबांशी तुझी बोलनी करून देतो असे सांगितले.

महानगरपालीकेच्या जी/नॉर्थ, दादर वॉर्डचे कर्मचारी श्री. म्हस्के यांना मला लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ३१/०७/२०१९ रोजी ०९:३० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि. गणेश कानडे यांना भेटुन वर नमुद प्रमाणे सर्व हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी मला लेखी तक्रार लिहुन देण्यास सांगितला. त्यानुसार मी माझा स्वहस्ताक्षरात हिंदीतुन लिहीलेला तक्रारअर्ज पो.नि. कानडे यांना दिला.

पो.नि. कानडे यांनी माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करणे आवश्यक आहे असे सांगुन दोन शासकीय पंचाना कार्यालयात बोलावले. पो.नि. कानडे यांनी माझी त्या दोन्ही पंचांची ओळख करुन दिली व माझा तक्रारअर्ज पंचाना दाखविला. सदरचा अर्ज पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. कानडे यांनी सही करून सदरचा तक्रार अर्ज आपल्या ताब्यात घेतला.

पो.नि. कानडे यांनी माझे तक्रारीची दिनांक ३१/०७/२०१९ रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन लोकसवक म्हस्के यास भेटण्यास जाण्यापुर्वी त्यांचे मोबाईलवर फोन करणार असल्याचे सांगितले. त्यानुसार दिनांक ३१/०७/२०१९ रोजी ला.प्र.वि. कार्यालयातुन पंचासमक्ष मी माझे मोबाईल फोन वरून लोकसेवक श्री. म्हस्के यांचे मोबाईलवर कॉल केला व किरण लोंढे यांची भेट घालून देण्याविषयी विचारणा केली. सदर वेळी म्हस्के यांनी किरण लोंढे हे सकाळी असतात. तु उदया सकाळी ये. सकाळी आल्यानंतर मी तुझी किरण लोंढेशी भेट घेवून देतो असे सांगितले. सदरवेळी आमच्या मध्ये मोबाईलवर झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी माझे तक्रारीची दिनांक ०१/०८/२०१९ रोजी श्री. म्हस्के यांची प्रत्यक्ष भेट घेवून पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगुन त्याकरीता दिनांक ०१/०८/२०१९ रोजी सकाळी ०८:३० वा. स्वामीनारायण मंदीर दादर पुर्व या ठिकाणी येण्यास सांगितले.

राम आशीष प्रजापति

त्यानुसार दिनांक ०१/०८/२०१९ रोजी माझ्या तक्रारीची पुन्हा पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान मी सकाळी ०८:३० वा. स्वामीनारायण मंदीर दादर पूर्व येथे आलो असता पो.नि. कानडे हे दोन पंच व पडताळणी पथकास हजर होते. सदर वेळी मी पंचासमक्ष श्री. म्हस्के यांना फोन केला असता श्री. म्हस्के यांनी मला भेटण्याकरीता बोलाविले. पो.नि. कानडे यांनी मोबाईलवर झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत आवश्यक त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून मला लावला. त्यानंतर मी पंच श्री. झटाले यांचेसोबत दादर पश्चिमेस येवून लोकसेवक श्री. म्हस्के यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. म्हस्के यांनी सकाळी किरण लोंढे होते. तु आला असता तर भेट घालून दिली असती. सकाळी किरण सहा वाजता येतो. तू सकाळी ये असे सांगितले. त्यानंतर मी पोलीस वाहनाजवळ परत आलो. सदरवेळी पो.नि. कानडे यांनी माझे तक्रारीची दिनांक ०२/०८/२०१९ रोजी श्री. म्हस्के यांची प्रत्यक्ष भेट घेवून पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगुन त्याकरीता दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. स्वामीनारायण मंदीर दादर या ठिकाणी येण्यास सांगितले.

त्यानुसार दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सकाळी ०६.१५ वा स्वामीनारायण मंदीर दादर पूर्व येथे आलो असता पो.नि. कानडे हे दोन पंच व पडताळणी पथकास हजर होते. सदरवेळी पो.नि. कानडे यांनी पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत आवश्यक त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर चालू करून मला लावला. त्यानंतर मी पंच श्री. झटाले यांचेसोबत दादर पश्चिमेस येवून लोकसेवक श्री. म्हस्के व श्री. शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. म्हस्के यांनी माझी श्री. किरण लोंढे यांचेशी भेट घालुन दिली. किंरण लोंढे यांनी मला भाजी विक्रीच्या धंदयावर कारवाई न करता धंदा चालू ठेवण्यासाठी माझेकडे महिन्याचे १०००/– रूयांची लाचेची मागणी करून लाचेची रक्कम श्री. म्हस्के यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर श्री. म्हस्के यांनी मला लाचेची रक्कम रूपये १०००/– ही ११.०० वाजता घेवून येण्यास सांगितले. मी पोलीस वाहनाजवळ परत आलो. पोनि. कानडे यांनी मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन तो बंद केला.

सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पोलीस वाहनामध्ये पो.नि. कानडे तसेच पंचांनी ऐकले असता, लोकसेवक श्री. किरण लोंढे व लोकसेवक श्री. म्हस्के यांनी माझा भाजी विक्रीचा धंदा कारवाई न करता धंदा चालू ठेवण्यासाठी माझेकडे महिन्याचे १०००/– रूयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व कारवाई पोलीस वाहनातच करण्यात आली. त्यादरम्यान मी लोकसेवकास लाच म्हणुन देण्याकरीता लागणारी रक्कम रूपये १०००/– पो.नि. कानडे यांना दिली. पो.नि. कानडे यांनी पथकातील एका कर्मचाऱ्या कडून त्या नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्यांनतर पो.नि. कानडे यांच्या सुचनेनुसार पोलीस वाहनाचे चालक श्री. मर्चंडे यांनी मला व पंचाना अॅन्थ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व तसे प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर श्री. मर्चंडे यांनी मी दिलेल्या रु. २००/– दराच्या एकुण ५ चलनी नोटांना पोलीस वाहनामध्येच अॅन्थ्रॉसीन पावडर लावली आणि माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात अलगद ठेवल्या.

पो.नि. कानडे यांनी मला सुचना दिल्या की, लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यांनतरच मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशातील लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून लोकसेवकास दयावी. तसेच लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डावा हात सतत डोक्यावरून फिरवून लाच स्विकारल्याचा इशारा दयावा असे सांगितले व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्या शर्टाच्या आत बनियनला लावला नंतर मी, पंच व सापळा पथकासह दादर पश्चिमेस गेलो. प्रथम मी लोकसेवक श्री.

म्हस्के यांची भेट घेतली त्यानंतर श्री. म्हस्के यांनी लोकसेवक शिंदे यांची भेट घालुन दिली. सेनापती बापट रोड वरील इराणी मंझील इमारतीच्या तळमजल्यावरील पॅसेजमध्ये आमचेमध्ये माझे कामाचे संदर्भाने चर्चा झाली. त्यावेळ लोकसेवक श्री. शिंदे यांनी लाचेच्या रक्कमेबाबत मला खुनवले. मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लोचची रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक श्री. शिंदे योंचे समोर धरली असता श्री. शिंदे यांनी लाचेची रक्कम म्हस्के यांचे कडे देण्यास सांगितले. त्यानुसार मी लाचेची रक्कम श्री. म्हस्के यांना दिली असता ती, त्यांनी उजव्या हाताने स्विकारून परिधान केलेल्या शर्टाच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी पर्वनियोजित इशारा म्हणुन माझा डाव्या हात डोक्यावरून सतत फिरवून लाच स्विकारल्याचा इशारा दिला असता जवळचं असलेल्या पोलीस पथकातील अंमलदारानी लोकसेवक श्री. शिंदे व म्हस्के यांचे दोन्ही हात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी लोकसेवक श्री. म्हस्के यांचेकडील लाचेची रक्कम पंचामार्फत ताब्यात घेतली. आमचे हात पंच क्र. २ सोडून तेथेच जिन्याखालील असलेल्या अधारात अल्ट्राव्हायलेट टॉर्चचे प्रकाशात तपासले.

त्यानंतर पो.नि. कानडे यांचे सुचनेनुसार पुढील सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयालत करण्यात आली व सदर ठिकाणी सविस्तर पंचनामा करण्यात आला.

१) आरोपी लोकसेवक अनिल शंकर म्हस्के, कामगार, २) आरोपी लोकसेवक महादेव आप्पा शिंदे, कामगार ३) आरोपी लोकसेवक किरण धर्मा लोंढे, कामगार यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत. तसेचं नमूद आरोपी लोकसेवकांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझे वैयक्तीक बचतीतुन आणलेली आहे.

तरी १) आरोपी लोकसेवक अनिल शंकर म्हस्के, कामगार, जी/उत्तर विभाग, मनपा, मुंबई २) आरोपी लोकसेवक महादेव आप्पा शिंदे, कामगार जी/उत्तर विभाग, मनपा, मुंबई ३) आरोपी लोकसेवक किरण धर्मा लोंढे, कामगार जी/उत्तर विभाग, मनपा, मुंबई यांनी माझा भाजी विक्रीचा धंदा कारवाई न करता धंदा चालू ठेवण्यासाठी माझेकडे महिन्याचे १०००/– रूपये हप्ता म्हणुन लाचेची मागणी करून आज रोजी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकीकृत करुन ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.